**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपली /दुसऱ्या टप्प्यासाठी उद्या अधिसूचना जारी होणार, महाराष्ट्रातल्या ८ लोकसभा मतदारसंघाचा समावेश

- लोकसभा निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून १७, तर वंचित बहुजन आघाडीकडून ८ उमेदवारांची पहिली यादी जाहीर

- महायुतीच्या स्टार प्रचारकांमधे नरेंद्र मोदी, अमित शाह, अनुराग सिंह ठाकूर, नितीन गडकरी, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडनवीस, अजित पवार, रामदास आठवले यांचा समावेश

- राष्ट्रीय तपास संस्थेच्या महासंचालकपदी भारतीय पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी सदानंद दाते यांची नियुक्ती

**आणि**

- छत्तीसगडमधे सुरक्षा दलाशीं झालेल्या चकमकीत दोन महिला बंडखोरांसह सहा माओवादी ठार

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपली. पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातल्या नागपूर, रामटेक, चंद्रपूर, भंडारा-गोंदिया आणि गडचिरोली-चिमूर या पाच लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. याठिकाणी उद्या अर्जांची छाननी होईल, शनिवारपर्यंत अर्ज मागे घेता

येतील.मतदान १९ एप्रिलला  होणार आहे.

**नागपूरमध्ये** भाजपाचे विद्यमान खासदार नितीन गडकरी आणि काँग्रेसच्या विकास ठाकरे यांच्या लढत आहे. वंचित बहुजन आघाडी या मतदारसंघात ठाकरे यांना पाठिंबा देणार आहे.

**रामटेकमध्ये** शिवसेनेचे राजू पारवे आणि काँग्रेसच्या रश्मी बर्वे यांनी अर्ज भरलेत.

**भंडारा-गोंदियात** भाजपाचे विद्यमान खासदार सुनील मेंढे यांनी अर्ज भरला असून काँग्रेसकडून डॉ प्रशांत पडोळे यांनी अर्ज भरला.

**चंद्रपूरमध्ये** राज्यातले वनमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि काँग्रेसकडून दिवंगत खासदार बाळू धनोरकर यांच्या पत्नी प्रतिभा धनोरकर यांनी अर्ज दाखल केलेत. वंचित बहुजन आघाडीकडून राजेश बेळे यांनी या मतदारसंघातून आज अर्ज भरला. या मतदारसंघातून एकूण २९ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत.

**गडचिरोली-चिमूरमधून** भाजपाचे विद्यमान खासदार अशोक नेते यांनी तर काँग्रेसकडून नामदेव किरसन यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. या मतदारसंघात एकूण १२ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. त्यात वंचित बहुजन आघाडीच्या हितेश मडावी यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना उद्या जारी होणार आहे. या टप्प्यात १२  राज्यं  आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या  लोकसभेच्या एकूण ८९ जागांसाठी निवडणूक होणार आहे. केरळमधल्या  २०  जागा, कर्नाटक १४, राजस्थान १३, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रात  प्रत्येकी ८ जागा, मध्यप्रदेश ७, आसाम आणि बिहारमध्ये प्रत्येकी ५, पश्चिम बंगाल आणि छत्तीसगडमध्ये प्रत्येकी ३, आणि मणिपूर, त्रिपुरा आणि जम्मू आणि काश्मीरमधल्या प्रत्येकी एका

जागेसाठी दुसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे. राज्यातल्या बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या लोकसभा मतदारसंघांचा यात समावेश आहे. येत्या ४ एप्रिल पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. ५ एप्रिलला अर्जांची छाननी होईल आणि ८ एप्रिलपर्यंत अर्ज मागे घेता येतील. या टप्प्यासाठी २६ एप्रिल रोजी मतदान होईल.

<><><><><>

लोकसभा निवडणुकांसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं आपल्या १७ उमेदवारांची पहिली यादी आज जाहीर केली. दक्षिण मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघातून अनिल देसाई, दक्षिण मुंबईतून अरविंद सावंत, ईशान्य मुंबईतून संजय दिना पाटील, वायव्य मुंबईतून अमोल किर्तीकर, ठाणे - राजन विचारे, रत्नागिरी सिंधुदुर्ग - विनायक राऊत, बुलढाणा - नरेंद्र खेडेकर, यवतमाळ-वाशिम - संजय देशमुख, मावळ - संजय वाघेरे-पाटील, सांगली - चंद्रहार पाटील, हिंगोली - नागेश पाटील आष्टीकर, संभाजीनगर - चंद्रकांत खैरे, धाराशिव - ओमराजे निंबाळकर, शिर्डी - भाऊसाहेब वाघचौरे, नाशिक - राजाभाऊ वाजे, आणि परभणीत संजय जाधव यांना उमेदवारी दिली आहे.

<><><><><>

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीनं आज ८ उमेदवारांची यादी जाहीर केली.

त्यानुसार अकोल्यातून वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर, भंडारा-गोंदियातून संजय केवात, अमरावती- -प्राजक्ता पिल्लेवान, चंद्रपूर राजेश बेले, बुलडाणा-वसंत मगर, गडचिरोली हितेश मांडावी, वर्धा- राजेंद्र साळुंके, तर यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघातून सुहास पवार वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार आहेत.

अकोल्यामध्ये मनोज जरांगे पाटील यांच्याबरोबर काल झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय झाल्याचं प्रकाश आंबेडकर यांनी बातमीदारांना सांगितलं. आगामी निवडणुकीत ओबीसी समुदायाबरोबर आघाडी होईल, तसंच मुस्लिम आणि जैन समुदायालाही उमेदवारी दिली जाईल, असं ते म्हणाले.

नागपूरमधल्या काँग्रेसच्या उमेदवाराला वंचितनं समर्थन जाहीर केल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. बाकी जागांची अंतिम यादी २ एप्रिलपर्यंत जाहीर होईल असं ते म्हणाले.

**<><><><><>**

भाजपानं लोकसभा निवडणुकीसाठी आज सातवी उमेदवार यादी जाहीर केली आहे. त्यात महाराष्ट्रातून अमरावती मतदारसंघात नवनीत राणा, तर कर्नाटकातून चित्रदुर्ग लोकसभा मतदारसंघात गोंविद करजोल, या◌ा◌ंना उमेदवारी जारी केली

आंध्रप्रदेश विधानसभा निवडणुकीसाठीही भाजपानं आज १० उमेदवारांची यादी जाहीर केली. तर हरियाणामधे कर्नाल विधानसभातून मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी उमेदवार म्हणून नायब सिंह सैनी यांचं नाव जाहीर केली आहे.

**<><><><><>**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं उमेदवारांची सातवी यादी जाहीर केली आहे. पक्षानं छत्तीसगडच्या सुरगुजा मतदारसंघातून शशी सिंह, रायगड मतदारसंघातून डॉ. मेनका देवी सिंह, बिलासपूर मतदारसंघातून देवेंद्र सिंह यादव आणि कांकेर मतदारसंघातून बिरेश ठाकूर यांना उमेदवारी दिली आहे. तर आर. सुधा. तामिळनाडूतल्या मायिला-धुथु-राई इथून निवडणूक लढवणार आहेत.

**<><><><><>**

आगामी लोकसभा निवडणुकांसाठी भारतीय जनता पार्टीनं आज आपल्या ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग सिंह ठाकूर, यांच्यासह, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पियुष गोयल, तसंच राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार, रामदास आठवले, नारायण राणे, रावसाहेब दानवे, अशोक चव्हाण, पंकजा मुंडे, चंद्रकांत पाटील, सुधीर मुनगंटीवार, या नेत्यांचा यादीत समावेश आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यावर मध्य प्रदेश आणि बिहार या राज्याच्या स्टार प्रचारकाची जबाबदारी सोपवली आहे. देवेंद्र फडनवीस यांची मध्य प्रदेशासाठी, तर विनोद तावडे यांची बिहारचे स्टार प्रचारक म्हणून नेमणूक झाली आहे. स्मृती इराणी आणि मनोज तिवारी यांचीही नावं स्टार प्रचारकांच्या यादीत आहेत.

<><><><><>

भारतीय पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी सदानंद दाते यांची NIA अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेच्या महासंचालकपदी नियुक्ती झाली आहे. १९९० च्या तुकडीचे भारतीय पोलीस सेवेतले हे अधिकारी सध्या महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख म्हणून काम पाहत आहेत. मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीनं दाते यांच्या नियुक्तीला ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत, अर्थात त्यांच्या सेवानिवृत्तीपर्यंतच्या कार्यकाळापर्यंत मान्यता दिल्याचं कार्मिक मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

छत्तीसगड राज्यातल्या आदिवासी बस्तर विभागात आज सुरक्षा दल आणि माओवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत दोन महिला बंडखोरांसह एकूण सहा

माओवादी ठार झाले. केंद्रीय राखीव पोलीस दल, कोब्रा बटालियन आणि जिल्हा राखीव रक्षकांचं संयुक्त पथक विजापूर जिल्ह्यातल्या बासागुडा भागातल्या जंगलात शोध मोहिमेवर असताना चिपूरभट्टीजवळ ही चकमक झाल्याची माहिती आमच्या वार्ताहरानं दिली. घटनास्थळावरून सहा माओवाद्यांचे मृतदेह, शस्त्रात्रांचा मोठा साठा आणि दारूगोळा जप्त करण्यात आला असून, या परिसरात अद्यापही शोध मोहीम सुरु असल्याचं स्थानिक पोलिसांनी सांगितलं.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय मैदानावर, सनराइजर्स हैदराबाद आणि मुंबई इंडियन्स यांच्यात सामना सुरु आहे. मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा सनराइजर्स हैदराबादच्या ७ षटकात  १ बाद १०२धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//